# जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

(महसूल शाखा )

सिध्देश्वर पेठ, सोलापूर पिनकोड -४१३००३

दूरध्वनी क्रमांक - ०२१७-२७३१०२०, ई-मेल revbrsol.rfsol-mh@gov.in

वाचले - १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ३०,३१,३४,४१ व ५१

३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसुचना क्र.करोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५, दि. १३ मार्च २०२०, १४मार्च २०२० व १५ मार्च २०२० रोजीच्या अधिसुचना

४) महाराष्ट्र शासन यांचे कडील अधिसुचना क्र. Dmu/२०२०cr९२/dism-१ दि. २३ व २४ मार्च २०२०.

५) गृह मंत्रालय भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.४०/०३/२०२०/डी, दि.२४/०३/२०२० रोजीचा आदेश

---

जा.क्र.-२०२०/मशा/कार्या-४/जिनिक/प्र.क्र.-२४१/ आरआर- ४५२ दिनांक :- ०९.०४.२०२०

विषय - राज्यात करोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**आदेश**

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ हा दि. १३.०३.२०२० अन्वये लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भ क्र. ३ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केले आहे.

ज्याअर्थी, (COVID-१९) कोरोना विषाणूच्या साथ संसर्गाचा प्रादूर्भाव झपाटयाने वाढत असल्याने आपत्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणुन मा. गृह सचिव भारत सरकार यांनी संदर्भ क्र. ५ अन्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम १० (२) अन्वये संपूर्ण देश भरात मार्गदर्शक सुचना आदेश लागू केलेले आहेत.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सोलापूर मला संदर्भ क्र. १, २ व ३ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर या अन्वये सोलापूर जिल्हयातील नागरिकांना खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

१. सर्व नागरिकांनी कोणत्याही कारणासाठी कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वावरताना ( उदा. रस्ते, वाहने, कार्यालये, बाजार इ.) कापडी मास्क किंवा रुमाल किंवा कापडाने नाक व तोंड झाकून वावरणे बंधनकारक करणेत येत आहे.

२. तसेच असे मास्क मानांकीत प्रतीचे अथवा घरगुती पध्दतीने तयार केलेले व योग्य पध्दतीने स्वच्छ व निर्जंतुक करुन पुन्हा वापरता येण्याजोगे असणे आवश्यक राहील.

३. कोणत्याही नागरिकांनी किंवा शासकीय /निमशासकीय/खाजगी कर्मचा-यांनी त्याचे स्वत:च्या अथवा कार्यालयाच्या वाहनातून आपल्या कार्यक्षेत्रात किंवा कार्यालय परिसरात प्रवास करताना, काम करताना, बैठकीचे वेळी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी दोन व्यक्तींनी एकत्र येताना सुरक्षित अंतर ठेवणे व मास्क वापरणे बंधनकारक करण्यात येत आहे.

४. सर्व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी वावरताना, शासकिय अधिकारी, व इतर सर्व विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी वरील सूचनांच्या बरोबर बैठकीसाठी अथवा इतर कोणत्याही कायदेशीर कारणासाठी एकत्र येताना परस्परात वैद्यकीयदृष्टया निर्धारित केलेले सुरक्षित सामाजिक अंतराचा ( Social Distancing ) निकष पाळणे बंधनकारक आहे.

५. कोणत्याही नागरीकांस सर्दी,ताप, खोकला, अंगदुखी, धाप लागणे, थकवा येणे इ. कोरोना सदृष्य आजाराची लक्षणे दिसत असल्यास त्वरीत त्यांनी जवळच्या रुग्णालयात तपासणी करुन घ्यावी व डॉक्टरांच्या सहायाने पुढील कार्यवाही करावी.

६. सर्व नागरिकांनी कोणतेही कामकाज पार पाडताना कोवीड - १९ या विषाणू संसर्ग प्रतिबंध उपाययोजनांची आवश्यक ती काळजी घ्यावी. शासनाच्या सार्वजनिक आरोग्य व कुटूंबकल्याण विभागाने यासंबंधी वेळोवेळी दिलेल्या सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर आदेशाचे उल्लघंन करणारी व्यक्ती उपरोक्त वाचा क्रमांक १ व २ नुसार तसेच भारतीय दंडसहिता १८६० चे कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र असून अशा व्यक्ती यांचे विरुध्द संबधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी कारवाई करावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करणेत येत आहे.

COLLECTOR OF SHOLAPUR

( मिलिंद शंभरकर भा.प्र.से. )
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर**

प्रति,

सर्व नागरिक, सोलापूर जिल्हा

प्रत :- आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर / मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर
पोलीस आयुक्त सोलापूर शहर / पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण
सर्व उपविभागीय दंडाधिकारी / सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी,

प्रत - जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका प्रशासन सोलापूर / मुख्याधिकारी सर्व

प्रत - जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांना माहितीसाठी व व्यापक प्रसिध्दीसाठी अग्रेषित
राष्ट्रीय सुचना विज्ञान अधिकारी, सोलापूर यांना प्रसिध्दीस्तव अग्रेषित